वाळू/रेती निर्गती धोरण-२०२५
(वाळू लिलावाची कार्यपद्धती व वाळू लिलावाच्या जाहिरातीबाबत)

**महाराष्ट्र शासन**
**महसूल विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः गौखनि-१०/०१२५/प्र.क्र.०५ (१५६९९९३)/खनिज-१,**
**हुतात्मा राजगुरु चौक,**
**मादाम कामा मार्ग, मंत्रालय मुंबई-३२,**
**दिनांक : ११ सप्टेंबर,२०२६**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम,२०१३ मधील प्रकरण पाच.
२. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांकः गौखनि-१०/०१२५/प्र.क्र.०५/ख-१, दि.०८.०४.२०२५
३. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांकः गौखनि-१०/०१२५/प्र.क्र.०५/ख-१, दि.०९.१०.२०२५
४. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांकः गौखनि-१०/०१२५/प्र.क्र.०५/ख-१, दि.१०.०४.२०२६

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र सागरी किनारपट्टी क्षेत्रातील नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वाळू/रेतीचे निष्कासन, नदीपात्रामधील वाळूचे निष्कासन, स्थानिक वापरासाठी व घरकुलांसाठी वाळू निर्गती करणे, खाजगी क्षेत्रामध्ये नैसर्गिक अथवा इतर कारणांमुळे साचलेल्या वाळूचे निष्कासन व मोठ्या खाणीमधील ओव्हरबर्डनमधून उपलब्ध होणाऱ्या वाळूचा विकास करणे इत्यादी बाबी विचारात घेऊन दिनांक ०८.०४.२०२५ च्या शासन निर्णयान्वये वाळू/रेती निर्गती धोरण-२०२५ निर्गमित केले आहे.

**०२.** वाळू/रेती निर्गती धोरण-२०२५ मध्ये वाळू लिलावाची जाहिरात, लिलावापूर्वी प्रथम फेरीसाठी किमान १५ दिवस अगोदर प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. तथापि, सदर धोरणामध्ये द्वितीय व तृतीय फेरीसाठी किती दिवस अगोदर जाहिरात प्रसिद्ध करावी. तसेच, प्रथम, द्वितीय व तृतीय फेरीसाठी आवश्यक पात्र निविदाधारकांची किमान संख्या किती असावी, याबाबत स्पष्टपणे तरतूद नाही. लिलावासाठी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत उद्योग विभागाची दिनांक ०१.१२.२०१६ रोजीची कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपद्धतीचा अथवा इतर विभागाच्या कार्यपद्धतीचा वापर केला जातो. उद्योग विभागामार्फत प्रसिद्ध केलेली कार्यपद्धती ही खरेदीसाठी असून लिलावासाठी असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सर्व जिल्हाधिकारी कार्यालयाकडून समान पद्धतीचा अवलंब होण्यासाठी व वाळू घाटांचे लिलाव तात्काळ होण्यासाठी लिलाव प्रक्रियेबाबत स्वयंस्पष्ट तरतूदी करणे आवश्यक आहे.

**०३.** वाळू उत्खननासाठी तांत्रिक उपसमितीकडून वाळू घाटांचे सर्वेक्षण करणे, तालुका व जिल्हास्तरीय समित्यांच्या शिफारसी घेणे, जिल्हा सर्वेक्षण अहवाल प्रसिद्ध करणे व पर्यावरण

अनुमती घेणे इत्यादी प्रक्रिया पूर्ण कराव्या लागतात, ज्यासाठी खूप कालावधी लागतो. तसेच, दिनांक १० जून ते ३० सप्टेंबर या पावसाळ्याच्या कालावधीत वाळू उत्खननास मनाई आहे. त्यामुळे त्याव्यतिरिक्त उपलब्ध कालावधीत जास्तीत जास्त वाळू घाटांचे लिलाव होऊन अनधिकृत वाळू उत्खननास आळा घालणे व शासनाच्या महसूलामध्ये वाढ होण्यासाठी लिलावाबाबतची जाहिरात किमान किती दिवस अगोदर प्रसिद्ध करावी व प्रत्येक फेरीमध्ये किमान किती लिलावधारक असावेत, याबाबत स्पष्ट मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

०४. सर्व जिल्ह्यामधील वाळू घाटांच्या लिलाव प्रक्रियेमध्ये समानता आणण्यासाठी वाळू/रेती निर्गती धोरणामध्ये सुधारणा करण्याची तसेच, काही तरतूदी नव्याने समाविष्ठ करण्याची व वाळू घाटांच्या लिलाव प्रक्रियेच्या अनुषंगाने विहित केलेले वेळापत्रक रद्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

वाचा क्र.२,३ व ४ येथे नमूद शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक गौखनि-१०/ ०१२५/ प्र.क्र.०५/ख-१, दि.०८.०४.२०२५, दि.०९.१०.२०२५ व दि.१०.०४.२०२६ मधील तरतूदीमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे:-

अ) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांकः गौखनि-१०/०१२५/प्र.क्र.०५/ख-१, दि.०८.०४.२०२५ मधील भाग-चार “लिलावाद्वारे निर्गती” या मधील अनुक्रमाक (इ) येथील “वाळू/रेती धोरणाच्या अंमलबजावणीचे सर्वसाधारण वेळापत्रक” ही तरतूद रद्द करण्यात येत आहे. तथापि, वाळू घाटांचे लिलाव विहित वेळेमध्ये व पारदर्शक रितीने पार पाडण्याच्या अनुषंगाने, जिल्हाधिकारी यांनी कालबद्ध पद्धतीने नियोजन तयार करून आवश्यक ती सर्व वैधानिक/तांत्रिक कार्यवाही विहित वेळेत पूर्ण होईल, याची दक्षता घ्यावी. तसेच, संबंधित लिलावधारकास वाळू गटाचा ताबा विहित वेळेत मिळून त्यांना उत्खननासाठी पुरेसा कालावधी उपलब्ध होईल, याची दक्षता घ्यावी.

आ) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांकः गौखनि-१०/०१२५/प्र.क्र.०५/ख-१, दि.०८.०४.२०२५, दिनांक ०९.१०.२०२५ व १०.०४.२०२६ मधील भाग-चार 'लिलावाद्वारे निर्गती' या मधील अनुक्रमांक (उ) "लिलावाची प्रक्रिया” मधील (i) येथे नमूद असलेली तरतूद अधिक्रमित करण्यात येत असून आता त्याऐवजी खालीलप्रमाणे सुधारित तरतुद अंतर्भूत करण्यात येत आहे :-

(उ) लिलावप्रक्रिया :-

(i) नदीपात्रातील पर्यावरण अनुमतीप्राप्त वाळूघाटांसाठी प्रथम प्रत्येक तहसिलदार यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व वाळू घाटांचा एकत्रित, एकच लिलाव (तालुकानिहाय) करण्यात यावा.तालुकानिहाय वाळू घाटांचे लिलाव होण्यासाठी प्रथम, द्वितीय व तृतीय फेरीचा अवलंब करण्यात यावा. सदर प्रमाणे कार्यवाही करुनही वाळू घाटांचे लिलाव न गेल्यास असे वाळू गट स्थानिक वापरासाठी राखीव ठेवण्याची कार्यवाही करावी. नदी पात्रातील वाळू घाटांसाठी लिलावाचा कालावधी, १ वर्ष अथवा

वाळू/रेती साठा संपेपर्यंत अथवा पर्यावरण अनुमती संपेपर्यंत यापैकी जे आधी घडेल ती मुदत अंतिम करण्यात यावी.

**इ) वाळू/रेती निर्गती धोरण-२०२५ मध्ये नव्याने भाग-चार (ऐ) "वाळू लिलावाची जाहिरात प्रसिद्ध करण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे" ही तरतूद खालीलप्रमाणे समाविष्ट करण्यात येत आहे:-**

**१) वाळू लिलावाच्या प्रथम फेरीचे (First Round) निकष:-**

a. जाहिरात कालावधी :- लिलावाची जाहिरात लिलावापूर्वी किमान १५ दिवस अगोदर प्रसिद्ध करण्यात यावी.
b. लिलाव वैध ठरवण्यासाठी किमान ३ (तीन) पात्र निविदाधारक असणे आवश्यक आहे.
c. ३ पेक्षा कमी, पात्र निविदा प्राप्त झाल्यास ही फेरी रद्द करून तात्काळ द्वितीय फेरीची प्रक्रिया सुरू करण्यात यावी.
d. सर्वोच्च बोली बोलणारा स्पर्धक यशस्वी बोलीधारक म्हणून समजला जाईल.
e. सर्वोच्च बोलीधारकाने (एच-१) लिलावाच्या उर्वरित रकमा जमा न केल्यास एच-१ च्या बोलीच्या दराने एच-२ किंवा एच-३ संपूर्ण रक्कम भरण्यास तयार असल्यास लिलावाची संपूर्ण रक्कम भरुन घेऊन प्रथम एच-२ चा विचार करावा व एच-२ तयार नसल्यास एच-३ ला संधी देण्यात यावी. तथापि, एच-२ आणि एच-३ ने असमर्थता दर्शविल्यास पुढे जास्तीत जास्त २ वेळा फेरलिलाव करावा.

**२) वाळू लिलावाच्या द्वितीय फेरीचे (Second Round) निकष:-**

a. जाहिरात कालावधी:- लिलावाची जाहिरात लिलावापूर्वी किमान ७ दिवस अगोदर प्रसिद्ध करण्यात यावी.
b. या फेरीत लिलाव वैध ठरवण्यासाठी किमान २ (दोन) पात्र निविदाधारक असणे आवश्यक आहे.
c. २ पेक्षा कमी, पात्र निविदा प्राप्त झाल्यास ही फेरी रद्द करून तात्काळ तृतीय फेरीची प्रक्रिया सुरू करण्यात यावी.
d. सर्वोच्च बोली बोलणारा स्पर्धक यशस्वी बोलीधारक म्हणून समजला जाईल.
e. सर्वोच्च बोलीधारकाने (एच-१) लिलावाच्या उर्वरित रकमा जमा न केल्यास एच-१ च्या बोलीच्या दराने एच-२ संपूर्ण रक्कम भरण्यास तयार असल्यास, लिलावाची संपूर्ण रक्कम भरुन घेऊन एच-२ चा विचार करावा. तथापि, एच-२ ने असमर्थता दर्शविल्यास पुढील फेरलिलाव करावा.

**३) वाळू लिलावाच्या तृतीय फेरीचे (Third Round) निकष:-**

a. जाहिरात कालावधी:- लिलावाची जाहिरात लिलावापूर्वी किमान ७ दिवस अगोदर प्रसिद्ध करण्यात यावी.
b. या फेरीत लिलाव वैध ठरवण्यासाठी किमान १ (एक) पात्र निविदाधारक असणे आवश्यक आहे.

c. एकही निविदा प्राप्त न झाल्यास ही फेरी रद्द करावी .

४) सर्वोच्च बोलीधारकास (एच-१) लिलावाच्या उर्वरित रकमा भरण्यासाठी १५ दिवसाचा कालावधी देण्यात यावा. सर्वोच्च बोलीधारकाने (एच-१) लिलावाच्या उर्वरित रकमा जमा न केल्यास, एच-१ च्या बोलीच्या दराने एच-२ किंवा एच-३ संपूर्ण रक्कम भरण्यास तयार असल्यास त्यांना अनुक्रमे ३ व २ दिवसाचा कालावधी देण्यात यावा.

५) लिलाव प्रक्रियेदरम्यान तांत्रिक तपासणी करताना लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्तीकडून काही आवश्यक कागदपत्रे अपलोड करावयाचे राहीले असल्यास, लिलाव स्पर्धात्मक होण्याच्या दृष्टिकोनातून त्यांना महाटेंडर या पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने लिलावाच्या दिनांकापूर्वी अपूर्ण कागदपत्रे सादर करण्यासाठी १ दिवसाची संधी देण्यात यावी.

६) ई-लिलाव प्रक्रियेसोबत ई-निविदा प्रक्रिया देखील राबविण्यात यावी. ई-लिलाव प्रकिया पूर्ण झाल्यानंतरच ई-निविदामधील दरपत्रक उघडण्यात यावे. ई-लिलाव व ई-निविदा यामध्ये सर्वोच्च बोली बोलणारा/नमूद करणारा स्पर्धक यशस्वी बोलीधारक म्हणून समजला जाईल. तसेच, याची स्पष्ट सूचना लिलाव/निविदा प्रक्रिया सुरु होण्यापूर्वी लिलाव/निविदाधारकास देण्यात यावी व तसे लिलाव/निविदेच्या अनुषंगाने प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या जाहिरातीमध्ये स्पष्ट नमूद करण्यात यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक २०२६०९१११८५४५१२४४८ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RATHOD UMESH DHARMA

Digitally signed by RATHOD UMESH DHARMA
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Department, 2.5.4.20=FA30EEF6A9E239E9B4F8129A1B10556B20319BBEC898D94F4E0E028A365FCEC5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3667A98F6D3E5F0ED5652697D674C2EB05D852DD34F87FDA6A20696C80787981, cn=RATHOD UMESH DHARMA
Date: 2026.09.11 18:55:58 +05'30'

**( डॉ. उमेश ध. राठोड )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, लोकभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अ.मु.स., मंत्रालय, मुंबई
३. मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रमांसह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण , अल्पसंख्याक विकास आणि औकाफ (वक्फ)) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानभवन, मुंबई
७. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
८. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानभवन, मुंबई
९. मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
१०. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा/ विधानपरिषद, विधानभवन, मुंबई

११.सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१२.सर्व मा.विधानसभा/विधानपरिषद सदस्य, विधानभवन, मुंबई.
१३.मा. मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य यांचे स्विय सहायक, मुंबई
१४.महालेखापाल-१, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), (लेखापरिक्षा), मुंबई.
१५.महालेखापाल-२, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), (लेखापरिक्षा), नागपूर.
१६.सर्व मंत्रालयीन विभाग.
१७.सर्व विभागीय आयुक्त.
१८. संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर.
१९.संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२०.प्रधान मुख्य वन संरक्षक, नागपूर.
२१.सर्व जिल्हाधिकारी.
२२.निवडनस्ती "खनिज-१ कार्यासन.